नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/07/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :– पो.स्टे. सावनेर दिनांक 21/04/2017 चे 19.14 वा. दरम्यान फिर्यादी नामे प्रमोद बालमुकंद कुमार वय 56 वर्ष रा. प्लॉट क्रमांक 2 शंभु नगर झिंगाबाई टाकळी, नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. 128/2017 कलम 353,186,504,506,34 भादवी सह कलम 3 म.शा.मा.नुकसान अधिनियम गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 20/04/2017 चे 21.00 वा. आरोपी नामे राहुल अधीकरण सावजी वय 33 वर्ष रा. भंसाळी टाकळी, नागपूर याने रेल्वेचे काम सुरु असतांना जेसीपीने मुरुम पसरवित असतांना आरोपीने जेसीपी चालक यास गावात बोलावुन प्रायव्हेट काम करण्यास सांगीतले. परंतु चालकाने नकार दिल्याने त्यास शिवीगाळ करून जेसीपीचे काच फोडुन नुकसान केले. व जिवाने मारण्याची धमकी दुेवन शासकीय काम बंद पाडले. आरोपीला दिनांक 25/04/2017 चे 11.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली होती.

सदर प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार श्री.नारायण बोरकर, पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले होते. आज दिंनाक 17/07/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. सुनिल पाटील, अतिरीक्त सत्र न्यायाधिश, नागपूर, यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 427 भादंवि. मध्ये कोर्ट उठेपर्यंत साधी कैदेची शिक्षा व 20,000/– रू. दंड, दंड न भरल्यास 1 महिना कैदेची शिक्षा, 2) कलम 341 भादंवि मध्ये कोर्ट उठेपर्यंत साधी कैदेची शिक्षा व 500/– रू. दंड, दंड न भरल्यास 5 दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. डगोरीया यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, वासुदेव मस्के, भवानीप्रसाद मिश्रा, पोहवा श्री. मनोज तिवारी, शेखर मेश्राम, पोना महेंद्र सहारे यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर मौजा मौजा धुरखेडा येथे दिनांक 11/07/2020 चे 22.30 वा. ते 23.00 दरम्यान उमरेड पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवेधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/टीसीडी – 106 क्रमांकाच्या बोलेरो पीकअप गाडीला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये आरोपी क्र. 1) समीर रशीद शेख, वय 23 वर्ष व 2) सलिम विठ्ठल दुपारे, वय 23 वर्ष, दोन्ही रा. धर्मापुर ता. भिवापुर यांच्या ताब्यातुन एकुण 11 गाई कि. 1,05,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आले. आरोपींच्या ताब्यातून वाहनासह एकुण किंमती 7,05,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक अरविंद रतनजी, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 (अ)ए, 9

महाराष्ट्र प्राणी संरक्षण सहकलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रदीप ठाकरे 8888803862 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर